**नि.ख.क्र. २६४/२०२१**
**निशाणी क्र. ३६**
**सरकार वि. बबन हाडप व इतर**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं.०१**

मी देवा शपथ खरे सांगतो की,

नाव :- राजु आनंदा कांबळे
वय :- ६३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
रा. :- मोटवाणी रोड, जि.नाशिक.

**सरतपास – अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जे.एस.रिके**

दि.०१/११/२०१९ रोजी मी नायब तहसिलदार म्हणुन इगतपुरी येथे नियुक्त होतो. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, इगतपुरी त्रंबकेश्वर उपविभाग यांनी दि.०१/११/२०१९ रोजी पत्र पाठविले होते. सदर पत्राद्वारे त्यांनी असे कळविले होते की पत्रकार गोपाळ शिंदे यांनी त्यांना व्हॉटसअॅप वरती तक्रार केली होती की इगतपुरी त्रंबकेश्वर उपविभागात बोगस जातीचे दाखल्यांचा सुळसुळाट झालेला आहे. सदर प्रकारावर तहसिलदार यांनी चौकशीकरीता माझी नियुक्ती केली. दि.१४/११/२०१९ रोजी मी बोगस प्रमाणपत्र धारक नामे वैशाली बाबुराव बोधले उर्फ सौ वैशाली विजय गोसावी, लंका दशरथ पोकळे उर्फ लंका लहानु लोबी, अशोक कोंडाजी धोंगडे, संजय शंकर दगडे, सायली संतोष जाधव, जिजाबाई बाबु होले, सिताराम दुंदा जाधव याना दि. २०/११/२०१९ रोजी चौकशीकरीता हजर राहण्यासाठी नोटीसा काढल्या. त्यादिवशी कोणीही हजर झाले नाही. दि.०४/१२/२०१९ रोजी वैशाली बोधले या हजर झाल्या आणि मी त्यांना चौकशीकरीता दि.०९/१२/२०१९ ही तारीख दिली.

**०२.** दि.०९/१२/२०१९ रोजी वैशाली बोधले आल्या नाही. मी तशी टिपणी नोंदवून मा.तहसिलदार यांना बोगस प्रमाणपत्रधारक चौकशीकरीता हजर होत नाही असे कळविले होते. दि.३१/१२/२०१९ रोजी प्रांत अधिकारी यांनी तहसिलदारांना पुन्हा पत्र दिले. सदर पत्राद्वारे प्रांत अधिकारी यांनी तहसिलदारांना कळविले होते की अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती यांनी प्रांत अधिका-यांना दि. १४/११/२०१९ रोजी कळविले होते की त्यांच्याकडे इगतपुरी तालुक्यामधुन जात पडताळणीकरीता बोगस जात प्रमाणपत्र सादर केले जात आहे व त्यावर चौकशी करुन संबंधित जातप्रमाणपत्र धारक व इ-सेवा केंद्र, सेतु कार्यालय, सीएसई सेंटर यांचेपैकी जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्यात यावी. त्याप्रमाणे तहसिलदार यांनी बोगसप्रमाणपत्र धारकांवर गुन्हा दाखल करणेकरीता माझी दि. १६/०१/२०२०रोजी नेमणूक केली. आता मला दि.१६/०१/२०२० रोजीचे पत्र दाखविले. त्यावर तहसिलदार यांची सही आहे ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ३७ देण्यात येते.

**०३.** दि.१६/०१/२०२० रोजी मी इगतपुरी पो.स्टे.,घोटी पो.स्टे व वाडीव-हे पो.स्टे. ला जावून सदर पत्र दाखविले आणि संबंधित बोगस जातप्रमाणपत्रधारकांवर गुन्हा दाखल करणेची विनंती केली. संबंधीत तीनही पो.स्टे. मधील अधिका-यांनी चौकशी करण्याचे आश्वासन दिले आणि गुन्हा दाखल करणेकरीता बोलविलेनंतर उपस्थित राहणेस सांगितले.

**०४.** दि.२८/०१/२०२० रोजी वैशाली बोधले, लंका पोकळे, अशोक धोंगडे, संजय डगळे हे माझे कायालयात आले व मी त्यांचे जबाब नोंदविले. अशोक धोंगडे यांनी सांगितले की त्यांनी जातप्रमाणपत्र बबन हाडप यांचेकडुन घेतले. लंका

पोकळे यांच्या पतीचा जबाब नोंदविला. त्यांनी असे सांगितले की जातप्रमाणपत्र त्यांनी अर्ज बबन हाडप यांना दिला होता. संजय दगडे यांनी सांगितले की निलेश डहाळे यांचेकडे त्यांनी जातप्रमाणपत्राकरीता कागदपत्रे व पैसे दिले होते. बबन हाडप व निलेश डहाळे यांचे दुकान तहसिलकार्यालया समोरच आहे. त्यामूळे मी शिपायाला पाठवून दोघांना बोलवून घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता बबन हाडप यांनी सेतू कार्यालयाचे संचालक पंकज चोपडे यांनी जातप्रमाणपत्र दिल्याचे सांगितले. निलेश डहाळे यांनी सांगितले की सेतू कर्मचारी नावेद शेख यांनी त्यांना दाखला दिलयाचे सांगितले. दि.३०/०१/२०२० रोजी मला घोटी पो.स्टे. मधुन फिर्याद दाखल करणेकरीता फोन आला. त्याप्रमाणे मी घोटी पो.स्टे. ला जावून तक्रार दाखल केली. आता मला सदर फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे . त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ३८ देण्यात येते. आता मला छापील एफआयआर दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ३९ देण्यात येते. आजरोजी तीन आरोपी न्यायालयात हजर आहेत. मी त्यांना ओळखतो. चौकशी करीता आम्हाला प्रांत कार्यालयाकडुन सदर बोगस प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती प्राप्त झाल्या होत्या.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपींकरीता उलटतपास वकील श्री. मेमन यांचेतर्फे</u>**

**०५.** हे म्हणणे खरे आहे की दि.१६/०१/०२० रोजी फिर्याद दाखल करणेचे आदेश झालेले असतांनाही सदर फिर्याद दि.३०/०१/२०२० रोजी का दाखल केली त्या १५ दिवसाचे विलंबाचे कारण फिर्यादीमध्ये नमूद केलेले नाही. दि.०१/११/२०१९ रोजी प्रांत कार्यालयाकडुन मला प्राप्त झालेले पत्र क्र. १३६८/२०१९ ची मुळप्रत मी पोलीसांसमक्ष हजर केली नव्हती. दि.१४/११/२०१९ रोजी बोगस प्रमाणपत्र

धारकांना पाठविलेल्या नोटीसा व त्याच्या आलेल्या पोहोच पावत्या मी पोलीसांसमक्ष सादर केल्या नाही. सदर मुळकागदपत्रे कार्यालयाच्या संचिकेत दाखल असल्यामूळे त्याच्या मुळप्रती पोलीसांसमक्ष सादर केल्या नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की दैनंदिन कामकाजाची नोंदवही आम्हाला रोज लिहावी लागते. दैनंदिन कामाकाजाची नोंदवही रोज ठेवणे हे क्षेत्रिय अधिका-यांना बंधनकारक आहे. मी कार्यालयीन अधिकारी असल्यामूळे दैनंदिन कामकाजाची नोंदवही ठेवणे मला बंधनकारक नाही. दि.१४/११/२०१९ रोजी नोटीस देवून बोगस प्रमाणपत्रधारक चौकशीकरीता हजर झाले नाही याचा अहवाल मी तहसिलदारांना सादर केला होता. सदर अहवालाची प्रत मी पोलीसांना फिर्याद दाखल करतेवेळी दिलेली नाही. दि.०४/१२/२०१९ रोजी वैशाली बोधले यांनी हजर होवून दिलेल्या लेखी अर्जाची प्रत मी पोलीसांसमक्ष सादर केली नाही. दि.३०/१२/२०१९ रोजी प्रांत अधिकारी यांनी तहसिलदारांना पाठविलेल्या मुळ पत्र किंवा त्याची प्रत मी पोलीसांसमक्ष सादर केली नाही. दि.२८/०१/२०२० रोजी बोगस प्रमाणपत्रधारकांचे नोंदविलेल्या जबाबाच्या प्रती मी पोलींसांसमक्ष सादर केल्या नाही. सदर प्रमाणपत्र धारकांनी त्यावेळेस बोगस प्रमाणपत्र सोबत आणले नव्हते त्यामूळे मी ते जप्त करुन माझे ताब्यात घेतले नाही. सदर फिर्याद दाखल करतेवेळी मी कोणत्याही बोगस प्रमाणपत्राच्या मुळप्रती पोलीसांना दिल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणताही गुन्हा घडलेला नसतांना तसेच कोणतेही बोगस कागदपत्रे जप्त केलेली नसतांना मी आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला. दि.२८/०१/०२० रोजी मी बबन हाडप व निलेश डहाळे यांना कार्यालयात बोलविले तेव्हा त्या दोघांचे जबाब नोंदविले होते. सदर जबाबाची मुळप्रत किंवा छायांकित प्रत फिर्याद देतांना पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी बोगस प्रमाणपत्रधारकांचे किंवा आ.क्र. १ व २ यांचे जबाब

नोंदविले नसल्यामूळे त्यांच्या प्रती मी पोलीसांना दिल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की सदर प्रकरणातील कोणतेही बोगस प्रमाणपत्राच्या मुळप्रती मला मिळालेल्या नाही. पंकज चोपडे यांना सेतु केंद्र चालविण्याची परवानगी मिळाल्याचे पत्र मी पोलीसांसमक्षा सादर केले नाही. सदर परवानगी देण्याचे काम कलेक्टर ऑफीस मधून होते. मी कलेक्टर ऑफीसमधुन पंकज चोपडा यांना सेतू केंद्र चालविण्याचे परवानगी मिळाल्याचे पत्र पोलीसांसमक्ष सादर केले नाही. माझया फिर्यादीमध्ये आता मला वाचून दाखविलेला अधोरेखांकित भाग अ मधील मजकूर वैशाली बोधले यांनी मला सांगितलेला होता. तो मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की मी सेतू कार्यालयामध्ये प्रत्यक्ष जावून चौकशी केली नाही. साक्षीदार सांगतो की जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले त्यादिवसापासुन सेतू कार्यालय बंद ठेवण्यात आले होते. मी चौकशी सुरु केली त्यादिवसापासुन सेतू कार्यालय बंद ठेवण्यात आले होते.

**०७.** सेतू कार्यालय बंद का ठेवली अशी नोटीस मी सदर सेतू कार्यालय धारकांना काढलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

( मोहिनी ननवरे )

दिनांक- ०६/०१/२०२६ अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

इगतपुरी